# मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ (म्हाडाचा घटक)


कार्यकारी अभियंता (सी-२ विभाग) कार्यालय, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, १०-१२, रोपालेन, चंदनवाडी, मरीन लाईन्स (पुर्व), मुंबई-४०० ००२.

दुरध्वनी क्रमांक: ०२२-२२०५ ४२ ३५ ई मेल: rreec2mhada@gmail.com


## ई-निविदा सुचना

कार्यकारी अभियंता (सी-२ विभाग) कार्यालय, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, १०-१२, रोपालेन, चंदनवाडी, मरीन लाईन्स (पुर्व), मुंबई-४०० ००२ या कार्यालयामार्फत खालील दर्शविलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामाकरीता म्हाडा / मु.म.पा./सा.बां. विभाग/कें.सा.बां.वि./रेल्वे /बी.पी.टी.अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांचेकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र कंत्राटदाराकडून खालील कामाच्या मोहरबंद बी-१ (टक्केवारी दर) निविदा मागविण्यात येत आहेत.

| अनु. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम (रुपये) | इसारा रक्कम (रुपये) (१ टक्का) | सुरक्षा अनामत रक्कम (रुपये) (२ टक्के) (५० टक्के प्रथम व ५० टक्के देयकातून) | निविदा शुल्क (रुपये) | काम पुर्ण करण्याचा कालावधी | ठेकेदारांची नोंदणी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | इमारत क्र.-**१७-२१, पिकेट रोड, मुंबई** या इमारतीची दुरुस्ती करणेबाबत. (मंडळाच्या निधीतून करावयाचे काम) . (3 री बोली ) | रु.१६,५३,०६४/- | रु.१६,५३१/- | रु.३४,०००/- | रु.५९०/- | १८ महिने | वर्ग-५-अ व त्यावरील |
| २. | इमारत क्र.-**२, मलहारराव वाडी, मुंबई** या इमारतीची दुरुस्ती करणेबाबत. (मंडळाच्या निधीतून करावयाचे काम) . (3 री बोली ) | रु.२८,२०,०७६/- | रु.२८,२०१/- | रु.५७,०००/- | रु.५९०/- | १८ महिने | वर्ग-५-अ व त्यावरील |
| ३. | इमारत क्र.-**७१-७९, दादी शेठ अग्यारी लेन व ८६, केवल क्रॉस लेन नं.०२, मुंबई** या इमारतीची दुरुस्ती करणेबाबत. (मंडळाच्या निधीतून करावयाचे काम) . (3 री बोली ) | रु.१३,१०,९८६/- | रु.१३,११०/- | रु.२७,०००/- | रु.५९०/- | १८ महिने | वर्ग-६ व त्यावरील |

०१.सदर निविदा २ मोहरबंद लिफाफा पध्द्तीने ऑनलाईन मागविण्यात येत आहे. तसेच सदर निविदांबाबतचा पुढील पत्रव्यवहार हा http://mhada.maharashtra.gov.in आणि http://mahatenders.gov.in या संकेतस्थळांवरच प्रसिध्द करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

०२.सर्व पात्र / इच्छुक कंत्राटदारांना निविदा संबंधित दस्तऐवज वेबसाईट http://mahatenders.gov.in यावर पाहून डाऊनलोड / अपलोड करता येईल. (दिनांक- **२७/०२/२०२६** सकाळी १०.०५ वाजल्यापासुन ते दिनांक- **०६/०३/२०२६** रोजी दुपारी ५.३० वाजेपर्यंत ).

०३. निविदा फि आणि अनामत रक्कमेचा भरणा ऑनलाईन पध्दतीनेच करावा.

०४. **तांत्रिक निविदा दिनांक-०९.०३.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता तसेच आर्थिक बोलीबाबतची निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी सकाळी ११.३० वाजता**, कार्यकारी अभियंता (सी-२ विभाग) कार्यालय, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, १०-१२, रोपालेन, चंदनवाडी, मरीन लाईन्स (पुर्व), मुंबई-४०० ००२ यांचे दालनात वेबसाईट http://mahatenders.gov.in वर उघडण्यात येईल

०५. तांत्रिक निविदा उघडतेवेळी कंत्राटदाराने, निविदा अपलोड करतांना सादर केलेल्या मुळ कागदपत्रांसह उपस्थित रहावे.

०६.**निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असलयाबाबतचे प्रतिज्ञापत्र व ठेकेदाराचे नाव काळया यादीत समाविष्ठ नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (लागू असल्यास) रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी केलेले मुळ प्रतीत सादर करावे. सदर मुळ प्रतिज्ञापत्रे निविदा नोटीस कालावधिमधील असणे अत्यावश्यक आहे. तसेच सदर मुळ प्रतिज्ञापत्रामध्ये निविदाकाराने स्वत:चे नाव, कंपनीचे नाव व सोबत ज्या इमारतीच्या कामाची निविदा भरणार आहे त्या इमारतीचे नाव व निविदा बोली क्रमांक नमुद करणे अत्यावश्यक आहे. सर्व निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.**

०७.निविदाकाराने अपलोड करावयाची माहिती पीडीएफ फॉरमॅटमध्येच अपलोड करावी.

०८. कंत्राटदाराकडे प्राधिकृत संस्थेकडून प्राप्त केलेले विहित नोंदणी वर्गातील डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट असणे आवश्यक आहे.

०९. एक किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय फेटाळण्याचे अधिकार सक्षम अधिका-यांकडे ठेवण्यात येत आहे.

१०. निविदाकारांना शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२४/प्र.क्र.०८/गृनिभू, दिनांक १४/०२/२०२४ मधील अटी व शर्ती लागू राहतील.

११. कंत्राटदारांना जी.एस.टी. नोंदणी अनिवार्य राहिल.

१२. सदर ई-निविदेचे दर एस.एस.आर. २०२०-२१ नुसार जी.एस.टी. वगळुन घेण्यात आलेले आहेत. मान्यता पावलेलया निविदादाराकडून जी.एस.टी. दर आकारण्यात येतील.

१३. जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्युनतम देकार सादर करणा-यानी अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम ८ दिवसांच्या आत भरली नाहीतर द्वितीय न्युनतम देकाराच्या निविदाधारकास लेखी विचारणा करुन तो जर प्रथम न्युनतम देकाराच्या दरापेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असेल तर त्याची निविदा मंजुर केली जाईल. अतिरिक्त सुरक्षा अनामत बाबत सविस्तर निविदा सुचना पहावी.

१४. सविस्तर निविदा सुचना http://mhada.maharashtra.gov.in आणि http://mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे. निविदेसंबंधी कागदपत्रे व ऑनलाईन निविदा सादर करणेबाबत आवश्यक ते मार्गदर्शन मिळण्याकरीता वेबसाईट http://mahatenders.gov.in वर संपर्क साधावा.

१५.मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी /प्रा.यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात आलेले परिपत्रक क्र.मुं.अ./निकाअ/न.क्र४८/९२३१/दुवपु-२०२२ दिनांक ९/१२/२०२२ च्या अटी सदर निविदेस लागू रहातील.

**निविदेबाबत शंका निरसनार्थ महाराष्ट्र पोर्टल यांना संपर्क साधावा.**

**दुरध्वनी क्रमांक-१८०० ३०७० २२३२ भ्रमणध्वनी क्रमांक- +९१-७८७८००७९७२ व +९१-७८७८००७९७३.**

Jadhav

**कार्यकारी अभियंता [सी-२ विभाग]**

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.